# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 December 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १६ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला प्रारंभ–३५ हजार ७८८ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर.
- बीड तसंच परभणी प्रकरणी विधानसभेत सविस्तर चर्चा करण्याचं अध्यक्षांचं आश्वासन.
- प्रख्यात तबलावादक उस्ताद जाकीर हुसैन यांचं निधन–समाजाच्या सर्व स्तरातून शोक व्यक्त.

आणि

- राज्यातल्या सात जिल्ह्यांत थंडीच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा.

****

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन आज नागपूर इथं सुरु झालं. विधानसभेत कामकाज सुरु होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन मंत्र्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर यावर्षीच्या पुरवणी मागण्या मंत्री उदय सामंत यांनी दोन्ही सभागृहासमोर सादर केल्या. ३५ हजार ७८८ कोटी ४० लाख रुपयांच्या या पुरवणी मागण्यांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्वाधिक साडे ७ हजार कोटी रुपयांच्या मागण्यांचा समावेश आहे. त्यासोबतच मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेसाठी ३ हजार ५० कोटी रुपये, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पंधराशे कोटी, मोदी आवास घरकुल योजनेसाठी साडे बाराशे कोटी, सहकारी साखर कारखान्यांना कर्जाकरता सुमारे बाराशे कोटी रुपये आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेच्या पटलावर आठ विधेयकं सादर केली. माजी राज्यपाल एस एम कृष्णा आणि विधानसभा सदस्य दिनकरराव जाधव यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव संमत होऊन, विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं.

विधान परिषदेतही उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी शोक प्रस्ताव सादर केला. आदरांजली अर्पण केल्यावर सभागृहाचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.

****

बीड हत्या प्रकरण तसंच परभणी हिंसाचार प्रकरणी स्थगन प्रस्तावादरम्यान सविस्तर चर्चा करण्यात येईल, असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं आहे. विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी हा मुद्दा उपस्थित केला, त्यावर या संदर्भात अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला. सरकारने याबाबत कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात विधानसभेत बोलतांना, या दोन्ही गंभीर घटनांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून संविधानाचा अपमान सहन केला जाणार नाही, असं स्पष्टपणे नमूद केलं. ते म्हणाले...

***दोन्ही घटना अतिशय गंभीर आहे. त्यामुळे निश्चितपणे त्याच्यावर चर्चा करुन त्याच्यावर सरकारने काय कारवाई केली? हे देखील आपण त्याठिकाणी बघू आणि विशेषत: परभणीच्या घटनेच्या संदर्भात मला यानिमित्ताने सर्वांनाच अपील करायची आहे की संविधानाचा अपमान कुणीच कधीच सहन करणार नाही.***

****

वॉटरग्रीड प्रकल्प आणि नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याचा दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं, राज्यमंत्रिमंडळातले नवनियुक्त मंत्री अतुल सावे यांनी म्हटलं आहे. मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. मंत्रिमंडळात समावेश झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. ते म्हणाले...

***खुप आनंद आहे. आमचे नेते आदरणीय देवेंद्र फडणवीस साहेबांच्या नेतृत्वात पुन्हा एकदा या महाराष्ट्राच्या प्रगतिशील***

***राज्यासाठी काम करायची संधी माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मला नक्कीच खात्री आहे की येणाऱ्या काळामध्ये आम्ही या महाराष्ट्राच्या विकासामध्ये पूर्णपणे काम करु. मराठवाड्यामध्ये दुष्काळामुळे नेहमी अडचण येतात ते आम्ही वॉटर ग्रील्ड आणि नदी जोड प्रोजेक्टच्या माध्यमातून पूर्ण करायचा प्रयत्न करू.***

****

राज्य महामार्ग परिवहन महामंडळ – एसटीला गेल्या महिन्यात ९४१ कोटी रुपये उत्पन्न मिळालं आहे. हे या वर्षातलं सर्वाधिक उत्पन्न आहे. या महिन्यात एसटीने दररोज सरासरी ६० लाख प्रवाशांची वाहतूक करून दररोज सुमारे ३१ कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न प्राप्त केलं.

****

राज्यसभेत आज संविधानावरच्या चर्चेला सुरुवात झाली. देशाने राज्यघटना स्वीकारुन ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त ही विशेष चर्चा होत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या चर्चेला सुरुवात करताना, राज्यघटना तयार करणाऱ्या सर्वांचं स्मरण केलं. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी या चर्चेत सहभागी होत, केंद्र सरकार राज्यघटनेला कमकुवत करत असल्याचं मत मांडलं.

उद्यापर्यंत राज्यसभेत यावर चर्चा होणार असून, भाजपनं आपल्या खासदारांना पक्षादेश जारी करुन सभागृहात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २९ डिसेंबरला आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून नागरीकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११७वा भाग असेल.

****

प्रख्यात तबलावादक उस्ताद जाकीर हुसैन यांचं अमेरिकेत निधन झालं, ते ७३ वर्षांचे होते. हृदयविकाराशी संबंधित त्रासामुळे त्यांना सॅनफ्रान्सिस्को इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, उपचारादरम्यान काल रात्री उशीरा त्यांचं निधन झालं. त्यांच्या कलाजीवनाचा वेध घेणारा हा संक्षिप्त वृत्तांत…

***नऊ मार्च १९५१ रोजी मुंबईत जन्मलेले जाकीर हुसैन यांनी त्यांचे वडील उस्ताद अल्लारखां यांच्याकडून तबला वादनाचे धडे घेतले आणि वयाच्या बाराव्या वर्षापासून ते कालपर्यंतच्या आपल्या सहा दशकांच्या कारकिर्दीत तबला वादनाला नवी ओळख मिळवून दिली. जगभरात विविध कलावंतांसोबतचं त्यांचं जुगलबंदी सादरीकरण हा रसिकांसाठी अद्भुत अनुभव ठरत असे. विविध चित्रपट आणि जाहिरातपटातून भूमिका केलेले जाकीर हुसैन यांना १९८८ साली भारत सरकारने पद्मश्री सन्मान प्रदान केला, हा सन्मान मिळालेले ते सर्वात तरुण व्यक्ती ठरले. त्यानंतर पद्मभुषण आणि पद्मविभुषण सन्मानाने त्यांचा गौरव करण्यात आला. संगीत क्षेत्रात आंतराष्ट्रीय पातळीवर मानाच्या ग्रॅमी पुरस्कारांवर त्यांनी पाच वेळा नाव कोरलं, यापैकी तीन पुरस्कार त्यांना याच वर्षी मिळाले होते. तबल्यावर थिरकणारी त्यांची जादुई बोटं आणि त्यातून उमटणारा अलौलिक तालध्वनि.. रसिकांच्या मनावर सदैव अधिराज्य करत राहतील.***

जाकीर हुसैन यांच्या निधनाबद्दल समाजाच्या सर्वच स्तरातून शोक व्यक्त होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातून अनेकांनी झाकीर हुसैन यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

****

प्रसिद्ध ऑर्गन वादक गायक पंडित संजय राम मराठे यांचं हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं आज ठाणे इथं निधन झालं, ते ६८ वर्षाचे होते. हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानं त्यांना ठाण्यात खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. संगीतभूषण पंडित राम मराठे यांचे ते ज्येष्ठ पुत्र होत.

****

परभणी इथं न्यायालयीन कोठडीतला आरोपी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेनं आज महाराष्ट्र बंदचं आवाहन केलं होतं. या बंदला परभणीसह जिल्हाभरात संमिश्र प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातली एसटी सेवा तसंच शहरातील शाळा आज बंद ठेवण्यात आल्या

छत्रपती संभाजीनगर इथं क्रांती चौकात आंबेडकरी संघटनांच्या वतीनं निदर्शनं करण्यात आली. जिल्ह्यात अजिंठा इथल्या मुख्य रस्त्यावरही ही या घटनेच्या निषेधात आंदोलन करण्यात आलं.
लातूर शहर आणि जिल्ह्यातही या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. शहरातील अनेक शाळा-महाविद्यालयं आज बंद होती. कुठलाही अनुचित प्रकार न घडता हा बंद शांततेत पार पडल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात आज दोन ठिकाणी वेगवेगळ्या घटनेच्या निषेधार्थ रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. परभणीतील घटनेच्या निषेधार्थ अंबाजोगाई - कळंब राज्य महामार्गावर रास्ता रोको तर मस्साजोगचे माजी सरपंच हत्याप्रकरणी डिघोळ अंबा इथं रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. ग्रामस्थांच्या वतीनं मागण्याचं निवेदन प्रशासनाला देण्यात आलं.

****

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि बीडसह, राज्यात अहिल्यानगर, पुणे, आणि गोंदिया या सात जिल्ह्यांच्या काही तुरळक भागात थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. राज्यात बहुतांश ठिकाणच्या तापमानात लक्षणीय घट झाली आहे. आज राज्यात सर्वात कमी किमान तापमान सोलापूर जिल्ह्यातील जेऊर इथं पाच अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. तर मराठवाड्यात नांदेड इथं ७ पूर्णांक ६, परभणी ८ पूर्णांक २, बीड ७ पूर्णांक ५, तर धाराशिव इथं ९ पूर्णांक ४ दशांश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवलं गेलं.

****

बॉर्डर गावसकर कसोटी मालिकेत ब्रिस्बेन क्रिकेट कसोटीत तिसऱ्या दिवसअखेर ऑस्ट्रेलियाच्या संघानं वर्चस्व गाजवलं आहे. ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात ४४५ धावा केल्या, तर जसप्रीत बुमराहनं सहा बळी टिपले. पावसामुळे आजही खेळात व्यत्यय आला. तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा भारतीय संघाच्या चार बाद ५१ धावा झाल्या होत्या. पहिल्या डावात भारतीय संघ ३९४ धावांनी पिछाडीवर आहे.

****

कनिष्ठ आशियाई हॉकी चषक स्पर्धेत भारतीय मुलींनी चीनचा पराभव करुन विजेतेपद पटकावलं. मस्कत इथं झालेल्या अंतिम सामन्यात १-१ अशा

बरोबरीनंतर भारतानं चीनचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ३–२ असा पराभव केला. या संघाचं हे सलग दुसरं विजेतेपद आहे.

****

राज्यात सोयाबीनला, किमान सहा हजार रुपये प्रति क्विंटल भाव द्यावा आणि १५ टक्के आर्द्रता असलेलं सोयाबीन खरेदी करणारी केंद्रं प्रत्येक बाजार समितीत सुरू करावीत अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे. सर्व बाजार समित्यांवर ही केंद्रे नसल्यामुळे शेतकऱ्यांना वाहतुकीचा खर्च परवडत नाही, त्यामुळे शेतकरी आपले सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांना कमी दराने विकत असल्याकडे किसान सभेनं लक्ष वेधलं आहे.

****